म.लो.आ.

# घोषणा

**विषय-** आयोगातील परीक्षांमध्ये आकृत्यांवर / नकाशांवर आधारीत प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन/ क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणा-या परीक्षांमधील बहुतांश प्रश्नपत्रिका या वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असतात. यातील काही प्रश्नपत्रिकांमध्ये काही मोजके प्रश्न आकृत्यांवर आधारीत / नकाशांवर आधारीत असतात. अशा प्रश्नांचे नेमके आकलन होण्यास दृष्टीहीन/ क्षीणदृष्टी उमेदवांराना अडचणी येतात. त्यामुळे अशा उमेदवारांसाठी नकाशा/ आकृत्यांवर आधारीत प्रश्न प्रतिकूल ठरतात. ही असमानता दुर करण्यासाठी आयोगाच्या परीक्षेतील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांपैकी **आकृत्या किंवा नकाशांवर आधारीत प्रश्न सोडविण्यापासून दृष्टीहीन/ क्षीणदृष्टी उमेदवारांना सूट देण्यात यावी व प्रश्नपत्रिकेतील उर्वरीत प्रश्नांच्या उत्तरांच्या आधारे, प्रमाणबद्ध वेटेज देऊन त्यांचे मुल्यांकन करण्यात यावे**. असा प्रस्ताव आयोगाच्या विचाराधीन आहे. उदा. १०० प्रश्न व १०० गुणांच्या प्रश्नपुस्तिकेत आकृत्यांवर/ नकाशांवर आधारीत ४ प्रश्न असल्यास असे ४ प्रश्न दृष्टीहीन/ क्षीणदृष्टी उमेदवारांनी सोडविणे आवश्यक नाही. उर्वरीत ९६ प्रश्नांमध्ये अशा उमेदवारांनी मिळविलेले गुण १०० पैकी गुणांत रुपांतरीत करण्यात येतील. उदा. ९६ पैकी ४८ गुण मिळाले असल्यास सदर गुण १०० पैकी किती या प्रमाणे रुपांतरीत केले जातील. वरील उदाहरणात ९६ पैकी ४८ गुण म्हणून १०० पैकी ५० गुण मिळाल्याचे गृहित धरले जाईल.

प्रचलित शासन निर्णयानुसार अंधत्व/ क्षीणदृष्टी प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांना ही सवलत देय राहील. जाहिरातीत या प्रवर्गासाठी राखीव पद असले किंवा नसले तरीही, या प्रवर्गातील उमेदवारांना वरील सवलत लागू राहिल. एंखाद्या परीक्षेत नेमके किती व नेमके कोणते प्रश्न आकृत्यांवर/ नकाशांवर आधारीत आहेत, ते संबंधीत प्रश्नपत्रिकेच्या **पहील्या उत्तरतालिकेच्या घोषणे सोबत प्रसिध्द केले जाईल.**

आयोगाच्या उपरोक्त निर्णयाबाबत काही **सूचना/ हरकती असल्यास त्या आयोगाकडे**, उमेदवारांचे **नाव, संपूर्ण पत्ता व इमेल आयडी सह** दिनांक **१० ऑक्टोबर, २०१७ पर्यत पाठवाव्यात.** त्यानंतर प्राप्त तक्रारी/ सुचनांचा विचार केला जाणार नाही. वरील **मुदतीत प्राप्त सुचना / हरकती विचारात घेवून अंतिम निर्णय घेतला जाईल.**

सुचना / हरकती mpscreview@gmail.com वर पाठवाव्यात. सुचना पाठवितांना **त्या संक्षिप्त व नेमक्या शब्दात पाठवाव्यात.**

प्रदीप कुमार,
सचिव

मुंबई
दिनांक- २८/०९/२०१७

Q:\LEENA\घोषणा.docx/१७